महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ४ था | दिनांक : २३/१२/२०२५ | वार : मंगळवार

## मुंबईत भाजपला रोखण्यासाठी 'मविआ'ची मोर्चेबांधणी



**मुंबई :** महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत आहेत. मुंबईत भारतीय जनता पक्षाला रोखण्यासाठी महाविकास आघाडीने एकत्र लढावे, यासाठी शिवसेना ठाकरे पक्ष कमालीचा आग्रही असल्याचे दिसत आहे. याच रणनीतीचा भाग म्हणून शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी फोनवरून चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे.

मुंबई महापालिकेत सत्ता मिळवण्यासाठी विरोधी पक्षांच्या मतांमध्ये फाटाफूट होऊ नये, ही ठाकरे गटाची मुख्य भूमिका आहे. काँग्रेसने मुंबईत स्वबळाचा नारा दिला असला, तरी महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढल्यास भाजपचा पराभव करणे सोपे जाईल, असे मत संजय राऊत यांनी राहुल गांधी यांच्याकडे मांडले आहे. भाजपला रोखण्यासाठी आपण एकत्र लढूया, असे आवाहन राऊत यांनी या संवादादरम्यान केल्याचे माहिती आहे.

ठाकरे बंधू एकत्र येणार?

एकीकडे काँग्रेसला सोबत घेण्याचे प्रयत्न सुरू असतानाच, दुसरीकडे शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यातील जागावाटपाची चर्चा आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. मुंबईच्या राजकारणात 'ठाकरे बंधू' एकत्र येण्याचे संकेत मिळत असून, आज किंवा उद्या या दोन पक्षांच्या युतीची अधिकृत घोषणा होण्याची दाट शक्यता आहे.

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचाही पाठिंबा

या नव्या राजकीय समीकरणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष देखील सकारात्मक असल्याचे दिसून येत आहे. शरद पवार यांचा पक्ष ठाकरे बंधूंसोबत महापालिका निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याची माहिती आहे. जर काँग्रेसनेही या आघाडीला साथ दिली, तर मुंबईत भाजपविरुद्ध 'महाविकास आघाडी' अधिक प्रबळ होण्याची चिन्हे आहेत.

मुंबई महानगरपालिकेवर पुन्हा एकदा भगवा फडकवण्यासाठी आणि भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी सर्वसमावेशक आघाडीचा पवित्रा घेतला आहे. आता राहुल गांधी आणि काँग्रेस पक्ष या प्रस्तावावर काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुख्यमंत्रीपद असो वा मंत्रिपद काहीच शाश्वत नाही : सुधीर मुनगंटीवार



**चंद्रपूर :** काँग्रेसने चंद्रपूर जिल्ह्यात प्रचंड मुसंडी मारल्यामुळे भाजप नेते सुधीर मुनगंटीवार प्रचंड आक्रमक झालेत. त्यांनी या प्रकरणी 'मुख्यमंत्रीपद असो वा मंत्रिपद काहीही शाश्वत नसते' असे तिखट मत व्यक्त करत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर निशाणा साधला आहे. विशेषतः त्यांनी बावनकुळेंना त्यांच्या पडत्या काळाचीही आठवण करून दिली आहे.

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकीत सत्ताधारी भाजपला दैदिप्यमान यश मिळाले. पण चंद्रपूर जिल्ह्यात पक्षाचा दारुण पराभव झाला. येथे काँग्रेसचे 11 पैकी 8 जागांवर नगराध्यक्ष निवडून आले. यामुळे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी भाजपच्या राज्यातील नेतृत्वावर टीकेची झोड उठवली आहे. त्यानंतर मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण मुनगंटीवार यांनी त्यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले, मी कधीच नाराज असत नाही. माझ्या आयुष्यात महादेवाने मला नाराज न होण्याची शक्ती दिली आहे.

पण भाजपचा एक निष्ठावान कार्यकर्ता म्हणून योग्य वेळी योग्य सल्ला देण्याची जबाबदारी माझी आहे. कार्यकर्ते जे भूमिका माझ्यापर्यंत पोहोचवतात ते सांगण्याची जबाबदारी माझी आहे. ती जबाबदारी व्यवस्थितपणे मी पार पाडतो. मला मंत्रिपद नाकारण्यात आले. त्याची नाराजी माझ्यात नव्हे तर येथील जनतेत आहे. मंत्रिपद येते आणि जाते. मुख्यमंत्रीपदही ज्यांचे आहे त्यांचे येणार आहे जाणारही आहे. पर्मनन्ट कुणीही नाही. शेवटच्या श्वासापर्यंत कुणीही मंत्री, आमदार, खासदार किंवा मुख्यमंत्री नाही.

सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मंत्रिपद नसण्याचा व पराभवाचा थेट संबंध नसतो या विधानाचाही समाचार घेतला. चंद्रशेखर बावनकुळे साहेबांना आता असे वाटणे साहजिक आहे. पण मध्यंतरी जेव्हा त्यांची शक्ती करण्यात आली होती, तेव्हा त्यांनाही असेच वाटत होते, असे ते बावनकुळेंना त्यांच्या पडत्या काळाची आठवण करून देताना म्हणाले.

## पाचवी कोणाकडे अन् घुगऱ्या कोण करतंय? : सुनील तटकरे

**रायगड :** जिल्ह्यातील नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. अलिबाग, महाड आणि विशेषतः तटकरेंचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या श्रीवर्धनमध्ये शिवसेनेच्या शिंदे गटाच्या मदतीने शेकापने राष्ट्रवादीवर 'सर्जिकल स्ट्राईक' केला आहे. या निकालानंतर आता महायुतीमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला असून सुनील तटकरे आणि मंत्री भरत गोगावले यांच्यात शाब्दिक युद्ध रंगले आहे. पाचवी कोणाकडे अन् घुगऱ्या कोण करतंय? असे म्हणत तटकरे यांनी गोगवले यांना टोला लगावला आहे.

सर्वात मोठा उलटफेर श्रीवर्धनमध्ये पाहायला मिळाला, जो मंत्री आदिती तटकरे यांचा विधानसभा मतदारसंघ आहे. येथे उद्धव ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावर निवडणूक लढवलेले अतुल चौगुले यांनी राष्ट्रवादीच्या जितेंद्र सातनाक यांचा पराभव करत नगराध्यक्षपदावर कब्जा केला. दुसरीकडे, महाडमध्ये मंत्री भरत गोगावले यांनी आपला गड राखला असून, शिवसेनेच्या सुनील कविसकर यांनी राष्ट्रवादीच्या सुदेश कळमकर यांचा पराभव केला आहे.

श्रीवर्धनमध्ये ठाकरे गटाचे उमेदवार निवडून आल्यानंतर त्यांच्या विजयोत्सवात सहभागी होण्यासाठी मंत्री भरत गोगावले स्वतः पोहोचले होते. महायुतीमधील मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादीच्या पराभवानंतर गोगावलेंनी विरोधी गटाच्या उमेदवाराचे स्वागत केल्याने सुनील तटकरे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

भरत गोगावले यांच्या भूमिकेवर टीका करताना सुनील तटकरे यांनी ग्रामीण म्हणीचा आधार घेत जोरदार टोलेबाजी केली. ते म्हणाले की, गेल्या अडीच-तीन वर्षांपासून जे लोक उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंवर खालच्या पातळीवर जाऊन टीका करत होते, तेच आज त्यांच्या विजयाचे स्वागत करायला उभे आहेत. आपल्याकडे ग्रामीण भागात म्हण आहे, 'पाचवी कोणाकडे चालते आणि घुगऱ्या कोण करते'. ज्यांच्याकडे मयती आहे, तेच घुगऱ्या करत आहेत आणि ज्यांची पाचवी आहे त्यांचे वेगळंच काही सुरू आहे.

सुनील तटकरे पुढे म्हणाले की, जे उमेदवार मशालीवर निवडून आले आहेत, त्यांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी महाडवरून लोक श्रीवर्धनला जात आहेत, हे अनाकलनीय आहे. या विधानामुळे रायगडच्या राजकारणात महायुतीमधील विसंवाद आता उघड झाला असून, आगामी काळात याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगवार २३ डिसेंबर २०२५


## कन्नड मध्ये सत्तांतर, काँग्रेसच्या फरिन शेख झाल्या नगराध्यक्ष



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड नगरपरिषद निवडणूकीत अजितदादा पवार गट व भाजप युतीने बहुमत मिळविले असले तरी, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्वाती कोल्हे यांचा पराभव होऊण येथे कांग्रेस च्या उमेदवार फरीन जावेद शेख या विजयी झाल्या आहेत.

बरिच वर्षे नगरपरिषदे वरती वर्चस्व असलेल्या कोल्हे परिवाराला पाय उतार व्हावे लागले, मात्र संतोष कोल्हे( राष्ट्रवादी काँग्रेस, अजीत पवार) यांच्या पॅनल ने १२ नगरसेवक जागा मिळवित नंबर चा मान मिळविला मात्र स्वता नगरसेवक पदासह त्यांच्या पत्नी तथा नगराध्यक्ष पदा च्या उमेदवार स्वाती कोल्हे यांना पराभव पत्कारावा लागला त्यामुळे येथे 'गड आला पण सिंह गेला' अशी अवस्था राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची झाली आहे. तर त्यांचा सहकारी पक्ष भाजप ने तीन जागा मिळविण्यात यश मिळवून बर्याच काळा नंतर कन्नड नगर परिषदेत प्रवेश केला आहे. आमदार संजनाताई जाधव यांच्या नेतृत्वातील शिवसेने (शिंदे) ला केवळ तीन जागांवर समाधान मानावे लागले. त्यामुळे हा मोठा धक्का माणल्या जात आहे. कॉंग्रेस पक्षाने तुलनेने दमदारपणे नगराध्यक्ष पदा सह सहा जागा मिळवित कामगिरी केल्याचे मानले जात आहे. एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे.

या नगर परिषद निवडणूकीचा परिणाम आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकी वर होणार असल्याचे जाणकारांचे मत आहे. विजयी उमेदवार पुढील प्रमाणे:- राष्ट्रवादी कॉंग्रेस (अ.प) १२ जागा:- गायकवाड सोनम अनिल, असलम इब्राहिम शेख, विद्या प्रवीण काशीनंद, युवराज बनकर, वर्षा ताठे, मनिषा सुरेश डोळस (चिठी काढून विजयी), रंजना रविंद्र राठोड, संतोष कचरु निकम, राहुल अशोक वाघ, शेख आरिफ अशीद, अलका भारत जाधव, शिवकुमार जैस्वाल, भारतीय जनता पक्ष (तीन जागा):- बैनाडे सोनाली प्रेमसिंग, कचरु आव्हाले, सोनाली सुनील पवार,काँग्रेस( सहा जागा):- शेख आलिया अजीज, अयाज मकबूल शाह, शेख कमरुनिसा अब्दुल रऊफ, शेख मुमताज बी फैजमहब्बत, अब्दुल जावेद वाहेद, शेख नफीसबेगम अब्दुल, शिवसेना (शिंदे गट) तीन जागा:- बेबीबाई सुरे, प्रकाश अग्रवाल, शितल घोंगटे, अपक्ष:- शेख अनिस मकबूल

## प्रा. डॉ. सतीश मस्के यांना सूर्योदय अक्षररत्न पुरस्काराने सन्मानित



**पिंपळनेर (प्रतिनिधी):** येथील कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व के.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ.सतीश मस्के यांनी साहित्यिक,शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना जळगाव येथील साहित्य संमेलनात 'सुर्योदय अक्षररत्न'पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.जळगाव येथे सूर्योदय सर्व समावेशक मंडळाच्या वतीने मुळजी जेठा महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केलेल्या अखिल भारतीय सूर्योदय मराठी साहित्य संमेलनात डॉ.सतीश मस्के यांना' सुर्योदय अक्षररत्न ' पुरस्काराने प्रसिद्ध गजलकार व माजी जिल्हाधिकारी दिलीप पांढरपट्टे ( मुंबई), प्रसिद्ध गजलनवाज भीमराव पांचाळे (यवतमाळ ), प्रसिद्ध लेखक डॉ.सतीश बडवे(छत्रपती संभाजी नगर) प्रसिद्ध लेखक व संमेलनाध्यक्ष डॉ.म.स. पगारे( जळगाव), ॲड. शुक्ला(एरंडोल )व सुर्योदय सर्वसमावेशक मंडळाचे अध्यक्ष सतीश जैन ( जळगाव) यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर या सोहळ्यात विविध साहित्य क्षेत्रातील कर्तुत्ववान व्यक्तींचाही पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.प्रा.डॉ.सतीश मस्के यांना या अगोदर शैक्षणिक , सामाजिक व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पाच वेळा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे 'खान्देशातील आंबेडकरी चळवळ' खंड १,२,३ त्याचबरोबर 'आंबेडकरी योध्दा' (गौरवग्रंथ),हंबरडा(कथासंग्रह) , 'दाटुन आलेल्या कळा'( कवितासंग्रह), 'माणुसकीचा गहिवर' (ललित लेखसंग्रह) असे सात ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. त्याचबरोबर त्यांनी विविध साहित्य संमेलनाच्या परिसंवादात, चर्चासत्रात,कवी म्हणून संमेलनात सहभाग नोंदवला असुन त्यांचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विद्यापीठ स्तरीय अशा विविध पातळीवर शोधनिबंधही प्रकाशित झालेले आहेत.पुरस्कार मिळाल्याबद्दल मित्र परिवाराकडुन त्यांचे अभिनंदन होत आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री ज्योती राणे यांनी केले तर आभार डी.बी.महाजन यांनी मानले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २३ डिसेंबर २०२५


## राष्ट्रीय गणित दिवस : विद्यार्थ्यांनी गणिताची भीती दूर करत यशस्वी व्हावे; मोहसीन खान



**जळगाव :** थोर गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती २२ डिसेंबर रोजी राज्यभरात उत्साहात साजरा करण्यात आली.याचे औचित्य साधत इकरा पब्लिक स्कूल येथे गणित उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.त्यात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या गणित उत्सवात गणित सोडवण्याच्या सोप्या पद्धती तसेच विविध आकृत्यातील संबोध भिंतीपत्रके प्रदर्शित करण्यात आली.शाळेत गणित उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते,याला मोठ्या संख्येने विद्यार्थी हजर होते. यावेळी विद्यार्थ्यांना जीवनात आणि व्यवहारात गणिताचे महत्त्व किती आहे, हे पटवून देण्यात आले.तसेच गणिताची भीती दूर करण्यासाठी कशा पद्धतीने सराव करायला हवा यांचे सूत्र देखील विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन उपमुख्याध्यापक तथा गणित विभाग प्रमुख मोहसीन खान यांच्या हस्ते पार पडले.तसेच साजीद खान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या उत्सवात यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |





# जयभवानीत विद्यार्थी समुपदेशन व व्यावसाय मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न



**पाटोदा (प्रतिनिधी)** दि.२० डिसेंबर : आजच्या विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी लेखन व संभाषण कौशल्य आत्मसात करावीत !असे प्रतिपादन प्रा.डॉ.संगीता आहेर यांनी केले.त्या पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आयोजित." विद्यार्थी समुपदेशन व व्यावसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या " प्रथम सत्रात "लेखन व संभाषण कौशल्य "या विषयावर प्रमुख वक्त्या म्हणुध बोलत होते.पुढे बोलताना त्या म्हणाल्या की जागतिकीकरणात बदलत्या काळात आपण स्वत:मध्ये बदल करून घेणे आवश्यक आहे.व्यवहार विनिमयाचे साधन म्हणुन भाषा अत्यंत महत्वाची आहे. तेव्हाआवश्यक लेखन व संभाषण कौशल्य आत्मसात करून आपले आयुष्य घडवावे !असे शेवटी विद्यार्थ्यांना अहवान केले.या कार्यशाळेचे उदघाटक म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय,गढीचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते प्रमुख पाहुणे म्हणुन महिला महाविद्यालय,गेवराई चे प्राचार्य डॉ.तात्याराम सोंडगे हे होते.तर प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.डॉ.दत्ता तंगलवाड ,प्रा. डॉ.कलंदर पठाण,प्रा.डॉ. सुनिल जाधव,आजिवन शिक्षण व निरंतर सेवा विभागाच्या समन्वयक प्रा.श्रीमती कल्पना घारगे,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक,कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा.प्रकाश नाईकवाडे,आदिची व्यासपीठावर उपस्थिती होती.या कार्यशाळेचे प्रस्तावीक प्रा.डॉ.कल्पना घारगे यांनी केले.उदघाटनपर भाषणात उदघाटक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी सांगितले की परस्थिती नुसार विद्यार्थ्यांना नवनविन ज्ञान देण्यासाठी अशा कार्यशाळेचे आयोजन केले जाते.विद्यार्थ्यांनी या दोन दिवस चालणाऱ्या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे अहवान केले.प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.तात्याराम सोंडगे यांनी सांगितले की बदलत्या काळात कौशल्य विकसीत करणे गरजेचे आहे.काळानुरुप आवश्यक कौशल्य आत्मसात करावीत अशी अपेक्षा व्यक्त केली.अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी अश्या कार्यशाळा घेतल्या जातात.या दोन दिवसीय कार्यशाळेत प्रथम सत्रात 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन 'या विषयावर प्रा. डॉ.दत्ता तंगलवाड तर,'लेखन व संभाषण कौशल्य 'या विषयावर प्रा. डॉ.संगीता आहेर या मार्गदर्शन करणार आहेत तर द्वितीय सत्रात ' व्यक्तीमत्व विकास 'या विषयावर प्रा.डॉ.सुनिल जाधव व ' उद्योग व व्यवसाय ' या विषयावर उद्योजक श्री.संजय गव्हाणे यांची मुलाखत घेतली जाणार आहे.तरी विद्यार्थ्यांनी या दोन दिवसीय कार्यशाळेत सहभाग नोंदवून आपली कौशल्य विकसीत करावेत असे अहवान आजिवन शिक्षण व निरंतर सेवा विभागाच्या वत्तीने अहवान करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या उदघाटन सोहळ्याचे बहारदार संचलन प्रा.अशोक देवगुडे यांनी केले तर आभार या विभागाचे सदस्य प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी मानले.या उदघाटन सोहळ्याचे फेसबुक लाईव्ह प्रेक्षपण नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले.या प्रसंगी आदित्य भाकरे या भूमीपुत्राची भारतीय सैन्यदलात अधिकारी म्हणुन निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वत्तीने त्याचा व आईचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी मुख्याध्यापक श्री.एल.आर.जाधव,युवा नेते राहुल बामदळे व सर्व प्राध्यापक आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# दुष्यंत कुमार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** यथार्थवादी गझलकार दुष्यंत कुमार यांच्या ५०व्या स्मृतीवर्षानिमित्त एमजीएम विद्यापीठाच्या Institute of Indian and Foreign Languages (IIFL) तर्फे दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. "पूरा रदीफ अधूरा काफिया" या शीर्षकाखाली हा परिसंवाद ४ व ५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित केला जाणार आहे.या राष्ट्रीय परिसंवादाचा मुख्य विषय "दुष्यंत कुमार : वास्तव, जनचेतना आणि लोकशाही सरोकार" असा असून, दुष्यंत कुमार यांच्या साहित्यिक योगदानावर, त्यांच्या गझलांमधील सामाजिक-राजकीय वास्तव, जनआवाज आणि लोकशाही मूल्यांवरील विचारांचा सखोल ऊहापोह केला जाणार आहे.आधुनिक हिंदी गझलेला नवी दिशा देणाऱ्या दुष्यंत कुमार यांनी गझलेला केवळ सौंदर्यप्रधान न ठेवता जनसामान्यांच्या प्रश्नांशी जोडले. त्यांच्या साहित्याने लोकशाही, सामाजिक संघर्ष आणि परिवर्तनाची चेतना प्रभावीपणे मांडली आहे. या परिसंवादात देशभरातील प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक सहभागी होणार असून विविध सत्रांतून त्यांचे साहित्यिक योगदान चर्चिले जाणार आहे.या परिसंवादामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील आणि चिकित्सक विचारक्षमतेचा विकास होईल तसेच साहित्य व समाज यांतील परस्परसंबंध अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल, असे आयोजकांनी सांगितले.हा परिसंवाद एमजीएम विद्यापीठ, एन-६ सिडको येथील Institute of Indian and Foreign Languages येथे होणार असून, साहित्यप्रेमी, अभ्यासक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.अधिक माहिती साठी डॉ. शहनाज बासमेह - 9852538888, डॉ. सुरेखा लक्कस 9975080017 यांच्याशी संपर्क साधावा

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २३ डिसेंबर २०२५

# भारतीय शेतकरी जीवनातील सामाजिक संकटांची हकीकत

23 डिसेंबर हा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय शेतकरी दिन (National Farmers Day) म्हणून साजरा केला जातो, कारण शेतकरी हा आपल्या सामाजिक-आर्थिक व्यवस्थेचा पाया आहे व देशाच्या अन्नसुरक्षेपासून ते सांस्कृतिक गुरुत्वापर्यंत अशा अनेक पैलूंमध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. परंतु ताज्या National Crime Records Bureau (NCRB) च्या 2023 च्या "Accidental Deaths and Suicides in India" या अहवालानुसार शेती व कृषीक्षेत्राशी संबधित हजारो लोकांनी आत्महत्या केल्याची घटना आपल्या सामाजिक-आर्थिक हिताच्या अंतर्गत गंभीर विचारण्यास भाग पाडते. या अहवालानुसार वर्षभरात 10,786 शेती क्षेत्राशी संबंधित लोकांनी आत्महत्या केली आहे जेथे 4,690 शेतकरी आणि 6,096 शेती मजूर यांचा समावेश आहे, आणि हे आकडे देशातील एकूण 1,71,418 आत्महत्यांपैकी सुमारे 6.3% इतका भाग आहे, म्हणजे रोज सरासरी जवळपास 29 ते 30 शेतकरी किंवा शेती मजूर आपल्या जीवनाचा निरोप घेत आहेत, आणि या आकडेवारीतील सामाजिक अर्थाचा अंतर्भाव आपल्याला शेतकरी समुदायाच्या जीवनातील खोल सामाजिक समस्यांकडे समजूतदारपणे पाहण्यास भाग पाडतो. या NCRB अहवालातील आकडे लिंगानुसार विभागले असता लक्षात येते की शेतकरी व शेती मजूर समुदायातील आत्महत्यांमध्ये पुरुषांची संख्या जास्त दिसते. आकडेवारीनुसार 4,690 शेतकऱ्यापैकी 4,553 पुरुष व 137 महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, तसेच 6,096 शेती मजूरांपैकी 5,433 पुरुष व 663 महिला शेती मजुरांनी आत्महत्या केली आहे, आणि या विभाजनातून आपण पाहू शकतो की शेतकरी समाजातील पुरुष आणि महिला दोघांवरही विविध स्वरूपांचे सामाजिक व आर्थिक तणाव परिणाम करीत आहेत. पुरुष शेतकऱ्यांवर सामाजिक प्रतिष्ठा, कुटुंबाची आर्थिक जबाबदारी, पिकांचे उत्पन्न आणि घराचा भरणा यासारख्या मानसिक दबावाचे भार अधिक स्पष्टपणे दिसतो, तर महिला शेतकरी व मजुरांना त्यांच्या कुटुंबातील भूमिकांबरोबरच आर्थिक सहभाग आणि सामाजिक मनोवैज्ञानिक ताण यांचा तडाखा भोगावा लागतो, ज्यातून आत्महत्येच्या घटनांचा सामाजिक-मानसिक संदर्भ अधिक गुंतागुंतीचा बनतो.राज्यवार आकडे पाहिले असता, आपले महाराष्ट्र हे राज्य NCRB अहवालानुसार सर्वाधिक आत्महत्यांच्या घटनांमध्ये अग्रस्थानावर आहे, जिथे सुमारे 38.5% शेती क्षेत्राशी संबंधित आत्महत्यांचे प्रकरणे महाराष्ट्रातून नोंदली गेली आहेत, त्यानंतर कर्नाटक (22.5%), आंध्र प्रदेश (8.6%), मध्य प्रदेश (7.2%) आणि तमिळनाडू (5.9%) अशा राज्यांमध्ये ही संख्या महत्त्वाची आहे, आणि या आकड्यांमधून हे स्पष्ट होते की कृषीप्रधान राज्यांमध्ये शेतकरी व शेती मजूर समुदायाच्या सामाजिक-आर्थिक समस्यांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे, जे ग्रामीण जीवनातील परिस्थितीच्या विविध पैलूंशी जुळलेले आहेत. NCRB अहवालानुसार आत्महत्यांच्या या घटनांमध्ये वार्षिक उत्पन्न ₹1,00,000पेक्षा कमी असलेल्या लोकांचा वाटा सुमारे 66.2% इतका आहे, आणि या आकड्यामुळे आर्थिक असुरक्षा हा शेतकरी जीवनातील एक महत्त्वाचा घटक असल्याचे स्पष्ट होते, कारण अनेक शेतकरी आपल्या उत्पन्नावर अवलंबून असतात आणि त्यांच्या वार्षिक उत्पन्नातील कमी पडलेले प्रमाण त्यांच्या कुटुंबीय खर्च, उत्पादन खर्च, कर्जाची परतफेड आणि सामाजिक आवश्यकतांसोबत संरेखित होत नाही, ज्यामुळे आर्थिक तणाव वाढतो आणि तो सामाजिक प्रतिष्ठा व मानसिक स्वास्थ्यावर खोल परिणाम करतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषित केल्यास शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न केवळ आर्थिक संकटापुरता मर्यादित नसून, तो सामाजिक संरचनेतील खोल समस्यांचे प्रतिबिंब आहे, कारण शेतकरी समुदायाच्या जीवनात सामाजिक प्रतिष्ठा, समुदायातील स्थान, कुटुंबीय जबाबदाऱ्या, कर्जाचा दबाव, बाजार भावातील अनिश्चितता, हवामानातील बदल, पिकांचे नुकसान व सामाजिक सुरक्षा यंत्रणेचा अभाव हे सर्व घटक एकत्रितपणे त्यांच्या मानसिक अवस्थेवर हे गंभीर प्रभाव टाकतात. त्यामुळे हा विषय व्यक्तिगत वृत्तीचा प्रश्न नाही तर सामाजिक-आर्थिक संरचनात्मक अस्तित्वाचा प्रश्न आहे. सामाजिक प्रतिष्ठा हा भारतीय ग्रामीण क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक आहे, ज्याचा प्रभाव शेतकऱ्याच्या सामाजिक जीवनावर, कुटुंबीय नात्यावर आणि समुदायातील स्थानावर दिसून येतो, आणि जेव्हा आर्थिक परिस्थिती व सामाजिक अपेक्षांमध्ये विसंगती निर्माण होते, तेव्हा तो मानसिक ताणात बदलतो. या ताणाचा परिणाम त्यांच्या निर्णय प्रक्रियेतून गंभीर निर्णयाकडे वळू शकतो, ज्यामध्ये आत्महत्याकडे वळण्याची शक्यता वाढते, कारण सामाजिक प्रतिष्ठा, घरातील आर्थिक स्थिती आणि सामाजिक अपेक्षांचा संयुक्त प्रभाव त्यांच्या चिंतनात प्रमुख भूमिका बजावतो. ग्रामीण समाजातील पारंपारिक सामाजिक संरचना, जिथे शेतकरी समुदाय सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये, परंपरा आणि सामाजिक सहयोग यावर आधारित असतो, आता बदलत्या आर्थिक युगात अधिक आव्हानात्मक बनत आहे, कारण आर्थिक दबावाने पारंपारिक सामाजिक समर्थन प्रणाली कमजोर होत आहे. शेतकरी कुटुंबातील पुरुष व महिला दोघांनाही विविध सामाजिक अपेक्षांचा सामना करावा लागतो आणि या अपेक्षांचे ताण त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर नकारात्मक परिणाम करतात. पुरुष शेतकरी, विशेषतः घरातील एक उत्पन्नकर्ता म्हणून, आर्थिक दबाव, कर्जाचे वाढते दडपण आणि कुटुंबीय अपेक्षा यांचा अत्यधिक ताण अनुभवतात, तर महिला शेतकरी व शेती मजूरांना कुटुंब, घरकाम आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचा तणाव जास्त जाणवतो. त्यामुळे दोन्ही लिंगांमध्ये मानसिक ताणाचे स्वरूप वेगवेगळे असले तरी परिणाम हे सामाजिक आणि व्यक्तिगत दोन्ही स्तरावर खोलवर दिसतात.श्रमाचे स्वरूप व शेतकरी आयुष्याचा नैसर्गिक अवलंबित्व यामुळे, हवामानातील बदल, पर्जन्याचे अनियमित स्वरूप, पिकांचे अपयश व उत्पादन खर्चातील वाढ हे सर्व शेतकऱ्यांच्या जीवनात (Economic risk) आर्थिक जोखीम वाढवतात. ज्या परिस्थितीत शेतकरी पावसावर विश्वास ठेवून पिके पेरतात आणि पावसाळ्यातील अनियमित पावसामुळे पिकांचे नुकसान होते, तेव्हा त्यांची आर्थिक स्थिती गंभीर संकटात येते. यासोबतच बाजारभाव कमी मिळाल्यास पिक उत्पादनाच्या खर्चाची भरपाईही होत नाही आणि त्यामुळे उत्पन्नात मोठी घट होते. अशा परिस्थितीत अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्यात अडकतात आणि कर्जाची परतफेड करण्यासाठी त्यांना मानसिक दबाव आणि सामाजिक प्रतिष्ठेतील ताणाला सामोरे जावे लागते, ज्यामुळे त्यांच्या जीवनात मानसिक सामाजिक असुरक्षा वाढते. हे सर्व घडताना सामाजिक समर्थन, समुदायाचा सहभाग, शेतकऱ्याना शाळा, शिक्षण व आरोग्य सुविधा यांचा अभाव ही समस्या आणखी जटिल करते.शेतकरी आत्महत्यांचा तपशील पाहिल्यास लक्षात येते की केवळ कर्ज हे एकमेव कारण नसून असे अनेक सामाजिक आणि मनोवैज्ञानिक कारणे आहेत ज्यांचा परिणाम आत्महत्यांचे आकडे वाढवण्यात दिसतो. ग्रामीण समाजात आर्थिक संकट व सामाजिक प्रतिष्ठेच्या ताणामुळे, व्यक्ती मनोवैज्ञानिकदृष्ट्या निष्काळजीपणा आणि निराशा यांना सामोरे जातात. सामाजिक स्वीकार, आत्म-आदर, कुटुंबातील भूमिका आणि समाजातील स्थान हे घटक त्यांच्या मानसिक स्थितीवर प्रभाव टाकतात. जेव्हा शेतकरी आर्थिक दृष्ट्या कमजोर असतो आणि सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात येते, तेव्हा मानसिक तणाव व सामाजिक दबाव यांचा एकत्रित परिणाम त्यांच्या मानसिक स्वास्थ्याला गंभीर आव्हान देतो, ज्यामुळे आत्महत्येच्या घटनांची शक्यता वाढते.ग्रामीण भागातील सामाजिक-आर्थिक असमानता, पायाभूत सुविधा व सामाजिक सुरक्षा यंत्रणांचा अभाव, आरोग्य व शिक्षण सुविधांचा मर्यादित विस्तार, सूचना व प्रशिक्षणाची कमतरता, महिला व पुरुष शेतकऱ्यांमध्ये उपलब्ध संसाधनांचा फरक आणि सामाजिक सहभाग यांचा परिणाम त्यांच्या जीवनातील मानसिक प्रश्नांवर दिसून येतो. जिथे सामाजिक-संस्कृतिक वातावरण मजबूत आहे, तिथे सामाजिक समर्थन, समुदायातील सहकार आणि पारिवारिक आधार यामुळे शेतकऱ्यांना मानसिक ताणातून बाहेर पडण्याची अधिक क्षमता असते, परंतु जिथे सामाजिक एकांतता, आर्थिक दबाव आणि समर्थनाचा अभाव आहे, तिथे शेतकरी व मजूर समुदायाला आत्महत्यांकडे वळण्याचा अधिक धोका जाणवतो. ग्रामीण समाजातील सामाजिक नेटवर्क आणि पारंपारिक सहायता पद्धतींचा परिणाम आत्महत्यांच्या घटनांवर नकारात्मक स्वरूपात दिसतो, कारण जोपर्यंत सामाजिक, आर्थिक व मानसिक आधार मजबूत होत नाही, तोपर्यंत व्यक्ती स्वतःच्या स्थितीशी संघर्ष करत असतात, आणि शेवटी हा संघर्ष त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम दर्शवतो.शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांमागील सामाजिक मूल्यांचे विश्लेषण हे आपल्याला सांगते की सामाजिक निर्बंध, पारंपारिक प्रतिष्ठा, कुटुंबीय अपेक्षा, आर्थिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक-मानसिक दबाव हे सर्व घटक एका गुंतागुंतीच्या संयोगातून त्यांच्या जीवनावर दबाव टाकतात. ग्रामीण समाजात आर्थिक संधींचा अभाव, सामाजिक सुरक्षा व विमा या यंत्रणांचा अपुरा विस्तार, मानसिक समुपदेशन सुविधा नाहीत किंवा मर्यादित आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मानसिक संघर्षाचे मुक्तपणे भाष्य करण्याची व उपाय शोधण्याची संधी कमी मिळते. यामुळे त्यांना आयुष्यातील समस्यांचा सामना करताना त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक प्रतिष्ठेच्या ताणाशी जुळवून घ्यावे लागते, आणि हे संघर्ष त्यांच्या मानसिक स्थितीवर खोल परिणाम करतात ज्यातून आत्महत्या सारख्या चरम निर्णयाकडे वळण्याची प्रवृत्ती वाढते.शेतकरी आत्महत्यांच्या आकड्यांमागील सामाजिक प्रतिमांचा अभ्यास करताना असे दिसून येते की आर्थिक धोरणे, बाजार व्यवस्था, शासकीय योजना, कृषी विमा, न्यूनतम समर्थन मूल्य आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांचा प्रत्यक्ष परिणाम जमिनीवर कसा लागू होत आहे, हेही महत्त्वाचे आहे. अनेक वेळा योजनांचे प्रत्यक्ष कार्यान्वयन, पारदर्शकता, वैयक्तिक व सामाजिक मतभेद, स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता यांचे मिश्रित परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनात दिसतात. कृषी विमा योजना प्रत्यक्षात उपयोगी पडत नाहीत किंवा तितक्या परिणामकारकपणे लागू होत नाहीत, MSP चा लाभशून्य होतो, कर्ज परतफेडीची वेळ व व्याज यांचा दबाव वाढतो, आणि उत्पादन खर्चाचा भार अधिकच वाढतो. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनातील अनिश्चितता आणि तणाव हे वाढते आणि सामाजिक प्रतिष्ठा व आत्म-आदर यांच्यात विरोधाभास निर्माण होतो, ज्याचा मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम होतो. राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आमच्या समाजाला एक चिंतनात्मक व व्यापक दृष्टीकोनातून शेतकऱ्यांचे जीवन, आर्थिक तणाव, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानसिक स्वास्थ्य यांच्यातील जटिल नाते समजून घेण्याची संधी देतो. हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की शेतकरी समुदाय केवळ अन्नाचे उत्पादक नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानसिक दृष्टिकोनातून आपला समाज टिकविणारा पाया आहे. त्यांच्या समस्यांचे निराकरण फक्त आर्थिक उपाययोजना किंवा कृषी सुधारणा पुरते मर्यादित नसून, सामाजिक सुरक्षा, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण व प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, आर्थिक समावेशन, सामाजिक सहभाग व पिकांच्या बाजारभावाचे संरक्षण यांचा एक समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सामाजिक नेटवर्क, समुदाय आधारित सहयोग, आरोग्य व मनोवैज्ञानिक समर्थन, कुटुंबीय सल्ला, समुपदेशन, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय हे सर्व घटक एकत्रितपणे शेतकऱ्यांना स्थिर व सकारात्मक भवितव्याकडे मार्गदर्शन करू शकतात.शेवटी, राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आपल्या सामाजिक धारणा व मूल्यांना नव्याने परिभाषित करण्याची, शेतकऱ्यांना सन्मान, सुरक्षा, प्रतिष्ठा आणि गरिमापूर्ण जीवनमान देण्याची एक सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. शेतकरी संकट हे फक्त कृषीशी निगडीत समस्या नाही, तर सामाजिक-मानसिक-आर्थिक समग्र समस्या आहे, आणि त्याचे निराकरण करण्यासाठी शासन, समाज, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि सरसकट नागरिकांनी एकत्र येऊन व्यापक सामाजिक व धोरणात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शेतकरी दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे ध्येय आणि त्यांच्या संघर्षाचे सामाजिक परिणाम हे आपल्या सर्वांचे कल्याण आणि प्रगती यांना जोडलेले आहेत, आणि त्या दिशेने सामाजिक न्याय, आर्थिक सुरक्षा व मानसिक आरोग्य सुनिश्चित करणे हे आपल्या सर्वांचे सामूहिक कर्तव्य आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

bagate.rajendra५@gmail.com

## गोंधळी

संबळ वाजवित
दारी आला गोंधळी
सुपात धान्य घेऊन
भरू त्याची झोळी

देवीच्या नावाचा
गोंधळ घालतो
वर्षानुवर्षे तो
लोककला जपतो

गळ्यात देवीची प्रतिमा
अन् कवड्यांची माळ
शोभे अंगात झबला
कुंकवाचं लाल कपाळ

देवीचा गजर करीत
दारोदारी फिरतो
करूनी कुळाचा उद्धार
हातवारे करीत नाचतो

संबळावर ताल धरूनी
गातो देवीचे गुणगान
संस्कृती जोपासण्यासाठी
देवूया त्याला दान



- **रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## कावळे दादा

कावळे दादा कावळे दादा असं काय झालं
घागरीतलं पाणी सारं सरूनिया गेलं

खडे टाकून टाकून गेली भरून घागर
नाही मिळाले रे गड्या पाणी पिण्या थेंबभर

रानं जळली रे सारी शेतशिवारात आग
दुष्काळाच्या तडाख्यात करपून गेलं जग

झाडं तोडण्याचं पाप कसं माणसांनी केलं
ढग रुसून बसता पाणी हरवून गेलं

असं तापलं हे पाणी दिसे कावळ्या मरण
पाण्याविना अधुरीच साऱ्या जीवाची तहान

माळरानावर लावू एक एक झाडं खास
अन् बोलवू पावसाला पुन्हा येईल पाऊस



**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**
मो. ९४०३३ ८४८८९

## श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा



**जालना** : दिनांक 22 डिसेंबर महान गणितज्ञ श्रीनिवासन रामानुजन यांच्या जयंती निमित्ताने राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.गणित दिवसानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन केले गेले. यामध्ये गणितावर आधारित रांगोळी स्पर्धा, पोस्टर आणि चार्ट स्पर्धा, गणितीय मॉडल व प्रकल्प स्पर्धा व प्रदर्शनी, विशेष यामध्ये इयत्ता दहावी चा उपक्रम WALL OF THEOREMS या भितीपत्रकाचे विमोचन तसेच रामानुजन के अनदेखे के पहलु चे माहिती पत्रक प्रदर्शित केले गेले.विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थिनींनी गणिताचे इलेक्ट्रॉनिक चा उपयोग करून मॉडेल , गणितीय पार्क, एटीएम मशीन, टूडी आकृतीचे थ्रीडी मॉडेल मध्ये रूपांतरण, गणितावर आधारित विविध पोस्टर्स सूत्रबद्ध पद्धतीने स्पष्टीकरण केले. इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थिनींची गणितीय प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था जालना येथील अधिव्याख्याता डॉ श्रीहरी दराडे यांनी विद्यार्थ्यांनीना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती गायत्री शुक्ला , पर्यवेक्षक श्री राजेश देशपांडे, गणित शिक्षक श्री चंद्रकांत दायमा, श्रीमती शिल्पा पारीख, श्रीमती प्रणिता वडगावकर, श्रीमती रुक्मिणी बिराजदार आणि श्री सौरभ राठी आणि विद्यालयातील सर्व शिक्षक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उत्साहाने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शिल्पा पारीख व आभार प्रदर्शन श्री.चंद्रकांत दायमा यांनी केले.